


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA




vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार ४ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २३१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# मराठा आरक्षणासाठी झटणारे मनोज जरांगे पाटील यांचा प्रवास आता रूपेरी पडद्यावर

## शिवाजी दोलताडे दिग्दर्शित संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील हा चित्रपट येत्या २६ एप्रिलला संपूर्ण महाराष्ट्रात

## - अभिनेते रोहन पाटील यांनी साकारली मनोज जरांगे पाटील यांची मध्यवर्ती भूमिका



**दैनिक वादळ वार्ता**

मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी संघर्ष करत असलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आयुष्याचा वेध घेणारा 'संघर्षयोद्धा' मनोज जरांगे पाटील हा चित्रपट येत्या २६ एप्रिलला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होण्यासाठी आता सज्ज झाला आहे. या चित्रपटाचा मुहूर्त हा जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे करण्यात आला होता आणि आता या चित्रपटाच्या प्रमोशनला ही येथूनच सुरुवात करण्यात आली आहे. शिवाजी दोलताडे यांनी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी निभावलेली असून सोनाई फिल्म क्रिएशन या निर्मिती संस्थेच्या गोवर्धन दोलताडे यांनी चित्रपटाच्या निर्मितीसह चित्रपटाचं लेखनही केलं आहे. सहनिमिति रामदास मेदगे, जान्हवी मनोज तांबे, दत्तात्रय लोहकरे कार्तिक दोलताडे, नर्मदा सिनेव्हिजन्स हे आहेत. तर डॉ. सुधीर निकम यांनी संवाद आणि पटकथा लिहिली आहे. या चित्रपटात मनोज जरांगे पाटील यांची मध्यवर्ती भूमिका अभिनेता रोहन पाटील यांनी साकारली आहे. "संघर्षयोद्धा" हा माझा पहिलाच बायोपिक आहे. याआधी मी मुसंडी, मजनू, धुमस असे चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. एखाद्या काल्पनिक गोष्टींवर चित्रपट बनवणे हे जरा सोपे असते कारण त्यात आपण काही गोष्टी या जोडू शकतो परंतु एखाद्या चालू घडामोडींवर चित्रपट हे तेवढेच कठीण असते. त्यामुळे हा चित्रपट बनवणे माझ्यासाठी मोठे चॅलेंज होते. पण वेळोवेळी मला स्वतः मनोज जरांगे पाटील यांनी आणि त्यांच्या टीमने योग्य ती मदत केली हे मी नक्कीच नमूद करू इच्छितो. आणि त्यामुळेच हे मी शिवधनुष्य पेलू शकलो असे दिग्दर्शक शिवाजी दोलताडे यांनी सांगितले. मी स्वतःला खुप भाग्यवान समजतो की मनोज जरांगे पाटील यांची व्यक्तिरेखा मला करायला मिळाली. आजवर अनेक वेगवेगळ्या चित्रपटातून मी भूमिका मी केल्या आहेत पण या चित्रपटातील ही व्यक्तिरेखा मला खुप काही देऊन गेली आहे. संघर्षातून उभे राहून आज ते एका वेगळ्या उंचीवर पोहचलेले आहेत. त्यांचे हावभाव आणि अन्य गोष्टींचा मी बारकाईने अभ्यास केला आहे आणि त्यांची सुद्धा मला तेवढीच साथ लाभली आहे. त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास नक्कीच बघण्यासारखा आहे आणि तुम्ही हा चित्रपट नक्कीच जाऊंन प हाल अशी मला खात्री असल्याचे अभिनेता रोहन पाटील यांनी सांगितले मनोज जरांगे पाटील यांचा संघर्ष हा खडतर असून संपूर्ण जगाला समजावा यासाठी मी या चित्रपटाची निर्मिति करण्याचा निर्णय घेतला. केवळ व्यक्तीसाठी न लढता समाजासाठी आज ते लढत आहेत ही छोटी गोष्ट नाही. त्यांनी आजवर अनेक उपषोण केली हार मानली नाही. माझे मी भाग्य समजतो की या चित्रपटाची निर्मिति करण्याची सुवर्णसंधी मला मिळाली असे चित्रपटाचे निर्मात गोवर्धन दोलताडे यांनी सांगितले काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या टीज़रला सोशल मीडियावर तुफान प्रतिसाद मिळाला होता आणि त्यानंतर सुप्रसिद्ध गायक अजय गोगावले यांच्या सुमधुर आवाजातील हृदयाला भिडणाऱ्या "उधळीन जीव..." या गीताने रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. या चित्रपटात अभिनेता संदीप पाठक, सागर कारंडे, अरबाज शेख, अभिनेते मोहन जोशी, श्रीनिवास पोकळे, संजय कुलकर्णी, अभिनेत्री सुरभी हांडे, माधवी जुवेकर, विजय मिश्रा, विनीत भोंडे, सुनील गोडबोले, माधव अभ्यंकर, सोमनाथ अवघडे, किशोर चौगुले, सिद्धेश्वर झाडबुके, उर्मिला डांगे यांच्या ही प्रमुख भूमिका आहेत.

## सौ सविता पाटील कोल्हापूर यांना जिजामाता पुरस्काराने सन्मान .

**वादळवार्ता/ हातकणंगले**

कोल्हापूर येथील सामाजिक कार्यकर्त्या ' व महिला पोलिस मित्र संघटनेच्या सदस्या सौ सविता महावीर पाटील कोल्हापूर बावडा यांचा गोवा येथे मान्यवराचे हस्ते राष्ट्रीय जिजामाता पुरस्कार प्रदान करण्यात आला .

डी.जी राठोड. फौंडेशन कोल्हापूर आणि गार्गीज डॉ आय डी . फौंडेशनच्या वतीने गोवा येथील कला व संस्कृतिक भवन पणजी गोवा सभागृहात राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते .



या कार्यक्रमाचे डॉ शिवाजी शिंदे पुश्लोक अहिल्याबई होळकर विद्यापीठांचे सहकुलसचिव यांनी भूषवले तर उद्घाटक वैध्य गुंडूपंत सुतार किर्लोस्करवाडी यांचे हस्ते झाले .

तसेच कांदबरीकार डॉ श्रीकांत पाटील ' गोवा अभिनेत्री अमिता नाईक ' कोल्हापूर जिल्हा पोलिस उपअधिक्षक सदानंद साहेब कार्यक्रमाचे मुख्य आयोजक डॉ सुरेश राठोड कार्यकारी संपादक दै रोखठोक मुख्य संपादक सुशिल अग्रवाल उपास्थीत होते सुत्रसंचालन सौ सविता पाटील कोल्हापूर यांनी केले .

## सौ.दिप्ती(प्रेरणा)वैभव गावकर-कुलकर्णी भारत गौरव राष्ट्रप्रेरणा पुरस्काराने सन्मानित

गुरुनाथ तिरपणकर)-लेक लाडकी अभिमान महाराष्ट्र राज्य आयोजित भारत गौरव राष्ट्रप्रेरणा पुरस्कार वितरण सोहळा २०२४नुकताच मुंबई मराठी पत्रकार संघाच्या लोकमान्य सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणा-या समाजसेविका आकांत नाटकाच्या लेखिका-दिग्दर्शिका,अभिनेत्री,पत्रकार तसेच प्रेरणा फाऊंडेशनच्या संस्थापिका-अध्यक्षा सौ.दिप्ती(प्रेरणा)गावकर-कुलकर्णी मुंबईच्या माजी महापौर किशोरीताई पेडणेकर यांच्या हस्ते भारत गौरव राष्ट्रप्रेरणा पुरस्कार२०२४ने सन्मानित करण्यात आले. दिप्ती(प्रेरणा)गावकर-कुलकर्णी यांनी प्रेरणा फाऊंडेशनच्या माध्यमातून गेली सहा वर्षे सांस्कृतिक,शैक्षणिक.सामाजिक,संगणकीय क्षेत्र,वैद्यकीय अशा विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य कले आहे.कोरोना काळातही दिप्ती(प्रेरणा)गावकर यांनी विशेष अतुलनीय असे कार्य केले आहे.आताही प्रेरणा गावकर-कुलकर्णी या प्रेरणा फाऊंडेशनच्या सहाव्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून वांगणी येथील स्पेशल चाईल्ड किनारा रेसिडेंशियल मतिमंद स्कुल साठी व साईशा योगेश परब या मतिमंद मुलीच्या उपचारासाठी प्रेरणा रंगमंच नाट्य मंडळ निर्मित"आकांत"या नाटकाचा शो आचार्य प्र.के.अत्रे नाट्यमंदीर येथे शनिवार दि.४मे रोजी सकाळी ११वाजता आयोजित केला आहे.नाट्य प्रयोगासाठी ९३७०८००८४२/८४५१९४८९९८

## शाई लावा रे, शाई!

१) मतदान आणि सुट्टी

"बाबा,आज मतदान आहे." चहा घेताना शिवाजी म्हणाला
"होय! माहिती आहे. आज- आता मतदानाला जाणार आहे. अरे, तुम्ही मतदान करणार आहात ना?"
"बघूया. जमले तर दुपारी येऊ."
"जमले तर म्हणजे? आज सुट्टी नाही? काल तर टीव्हीवर सुट्टी आहे म्हणून बातमी होती."
"हो. पण सायंकाळी सुट्टी रद्द झाल्याची सूचना आली."
"हा अन्याय आहे. तुम्ही कर्मचाऱ्यांनी या विरोधात आवाज उठवला पाहिजे. मतदानासारख्या पवित्र आणि हक्काच्या कामासाठी सुट्टी देत नाहीत म्हणजे काय?"
"बाबा, व्यवस्थापनाचेही बरोबर आहे. बहुतांश लोक मतदानाच्या दिवशी मतदान न करता, हक्काची सुट्टी असल्याप्रमाणे कुटुंबासह कुठे तरी फिरायला जातात."
"हेही चूक आहे. सुट्टी तर मिळालीच पाहिजे आणि त्याचबरोबरीने राष्ट्रीय कर्तव्य बजावले पाहिजे म्हणजे मतदान केले पाहिजे. यासाठी एक उपाय करायला पाहिजे तो म्हणजे मतदान केले असल्याची खूण बोटावरची शाई दाखवा तरच सुट्टी मान्य होईल अन्यथा त्या दिवसाचा पगार कपात करावा."
"बरोबर आहे, तुमचे. शेवटी दोन तासांची सुट्टी मिळाली आहे."
"चला. दोन तास तर दोन तास! भागते की लंगोटी सही! पण तुम्ही मात्र मतदान करण्याची सुवर्ण संधी गमावू नका बरे."
"नाही. बाबा, करतो आम्ही मतदान." शिवाजी म्हणाला आणि ते दोघे पती-पत्नी निघाले....

००००

नागेश शेवाळकर, पुणे

## श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठानचा आणाभाऊ साठे नाट्यगृहात पुरस्कार वितरण सोहळा

**मुंबई(सुदर्शन जाधव)-**

हौशी रंगभूमीवर आपल्या उज्वल कारकिर्दीचा ठसा उमटवून असलेल्या श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठानचा ४० "वर्धापन दिन" सोहळा रविवार दि.३१मार्च रोजी दुपारी ३.३० वा.अण्णाभाऊ साठे नाट्यगृह,राणीबाग,भायखळा मुंबई येथे संपन्न झाला.समारंभाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष श्री.दत्ता मोरे होते.प्रमुख पाहुणे साहित्यिक व मा.सहाय्यक पोलिस आयुक्त श्री धनंजय वंजारी,नितीन बनकर संचालक मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक, नाटककार भालचंद्र कुबल,अभय पैर इत्यादी उपस्थित होते.२०२४ चा जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते विजय गोखले,समाज भूषण पुरस्कार माजी नगरसेवक सुनील मोरे,नाट्य गौरव पुरस्कार नाट्य सिने अभिनेते मिलिंद गवळी,अरुण मेहता,सुभाष



नकाशे,पत्रकार समीक्षक संजय कुलकर्णी,निर्माता हरी पाटणकर यांना देण्यात आला.उद्योगरत्न किरण सेठ झोडगे,लोकशाहीर गौरव सुखदेव कांबळे,क्रीडा सुभाष अनभवने,पत्रकारिता यामिनी दळवी,समाजसेवा सदानंद चांदे,काव्य गौरव नंदकुमार सावंत,विघ्नहर्ता गौरव रमाकांत जाधव,अशोक सवने, तसेच समाज गौरव पुरस्कार जल फाउंडेशन कोकण विभाग व मराठा सामाजिक प्रतिष्ठान आदीना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठान गेली ४० वर्षे नाट्यक्षेत्रात अतुलनीय कामगिरी करत असताना अनेक नवोदित कलाकार घडवीत आहे. अनेक मान्यवरांनी आपली मनोगत व्यक्त केली.

## आजच्या सामाजिक प्रश्नावर भाष्य करणारी ही कविता आहे- प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील

**वादळवार्ता/छत्रपती संभाजीनगर : ( प्रतिनिधी )**

डॉ. शिवाजी हुसे हे शेती मातीशी नाळ जोडून असलेले लढाऊ व संघर्षशील कार्यकर्ता कवी आहे. त्यामुळे त्यांना समाजातील विसंगती, शेतकऱ्यांचे प्रश्न, वर्तमान वास्तव त्यांना अस्वस्थ करते. सामाजिक प्रश्नांवर परखड भाष्य करणारी ही कविता असून सामाजिक परिवर्तनाचा विचार मांडते. आता युद्ध अटळ आहे या संग्रहातील कविता ही आजच्या सामाजिक वास्तवाची कविता आहे असे प्रतिपादन मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी केले.(ता. ३१) शिवाजी हुसे यांच्या आता युद्ध अटळ आहे या कविता संग्रहाचे प्रकाशन छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा साहित्य परिषदेत संपन्न झाले या प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्ष स्थानी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह पवार होते तर व्यासपीठावर डॉ. राजकुमार यल्लावाड, प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. दिलिप बिरुटे, कवी डॉ. शिवाजी हुसे यांची उपस्थिती होती. प्राचार्य ठाले पाटील यांनी या कवितेवर भाष्य करतांना



सामर्थ्य स्थळाबरोबरच उणिवा ही दाखवून परखडपणे विचार मांडले. संग्रहावर भाष्य करतांना डॉ. राजकुमार एल्लावाड म्हणाले की, विरूपं घालवण्यासाठी उठवलेला आवाज व शब्दाविष्कार म्हणजे आता युद्ध अटळ आहे हा संग्रह होय. संवाद विरोध , समतोल ही लयतत्व सांभाळणारी ही कलाकृती आहे. अन्वयार्थक शिर्षक, आशयाशी अनुरूप भाषा शैली आणि कृषी , सामाजिक , राजकीय क्षेत्रातील विरूपावर कवी शिवाजी हुसे यांनी प्रहार केला आहे. असे मत व्यक्त करून विस्तृत भाष्य केले. अध्यक्षीय समारोप करतांना मानसिंह पवार म्हणाले की, आजची परिस्थिती भयावह असून प्रत्येकाला आज आपापल्या क्षेत्रात संघर्षाला सामोरे जावे लागत आहे. दैनंदिन काम करतांना प्रत्येकजण एक प्रकारे युद्धावरच असतो. घरी येई पर्यंत त्याच्या समोर काय प्रश्न निर्माण होतील सांगता येत नाही. त्यामुळे आता केवळ युद्ध अटळ नसून युद्धाला सुरुवात झाली आहे. डॉ. हुसे यांनी आपल्या कवितेतून परखड भाष्य केले आहे. असे मत मांडले. प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले की डॉ. हुसे हे केवळ वर्गापुरते शिक्षक नसून त्यांनी सामाजिक बांधिलकी स्विकारून समाजोपयोगी उपक्रमात स्वतःला झोकुन दिले आहे.

## संपादकीय

### "बोहणी"

(वृक्षमित्र विष्णू वाघ)

उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी असा पूर्वीचा काळ होता, काळ बदलत गेला तसं उत्तम नोकरी व कनिष्ठ शेती असा बदल झाला, पण व्यापार तेव्हाही मध्यम होता आणि आजही मध्यमच आहे मग व्यापारी तो कोणताही असो अगदी छोट्या पासून ते मोठ्या पर्यंत चहाच्या टपरी पासून ते मोठ्या दुकानदारापर्यंत, रस्त्यावरील भाजीवाल्यापासून ते मोठमोठ्या मार्केटमधील व्यापाऱ्यापर्यंत हा मध्यम दर्जातच येतो. याच प्रत्येक व्यापाऱ्याची दुकानदाराची रोजची कमाई असते त्यांना मासिक पगार नसतो. रोजच्या रोज होणारी कमाई त्यालाच काही लोक ताजा पैसा बोलतात, त्याच ताज्या पैशातून ते त्यांचा उदरनिर्वाह करतात रोज सकाळी दुकान उघडलं की देवपूजा करतात अगरबत्ती लावतात देवाला दिवा लावतात, मनोभावे दर्शन घेतात त्यानंतर वाट बघतात ते गिऱ्हाईकाची, पहिले गिऱ्हाईक आले की वस्तू किंवा जो काही माल देतात आणि पैसे घेतात, ते पैसे हातात घेऊन दुकानदार त्या पैशांच्या पाया पडतात त्याच पैशांना " बोहणी" झाली असं म्हणतात.

बोहणी चांगली झाली म्हणजे पहिल्या आलेल्या लक्ष्मीला पैशाला काही नाट लागू नये, कटकट होऊ नये म्हणून गिऱ्हाईकाच्या मनावर त्याच्या मुडवर घेतले जाते, एकदा का बोहणी चांगली झाली की दिवसभर चांगला धंदा होतो असा सगळ्याच दुकानदारांचा समज आहे आणि दुकानदारांच्या अनुभवावरुन खरे आहे, बोहणी आल्यानंतर गल्ल्यात असलेल्या देवासमोर ठेवतात.

सिन्नर येथे पास्ते रोडला अजिंक्यतारा थांब्याशेजारी " हॉटेल महेश" नावाचे हॉटेल आहे, तेथे मात्र बोहणीचा प्रकार काही वेगळाच पहावयास मिळाला, त्या हॉटेलमध्ये रोज झालेली बोहणीचे पैसे तिथे असलेल्या एका स्टीलच्या डब्यात टाकले जातात त्या डब्याला कुलूप लावले आहे, त्यात वरतून साफटीतून टाकले जातात, हॉटेलचे मालक श्रीयुत भरत शिंदे व महेश शिंदे हे रोज सकाळी जी काही बोहणी होईल मग ती कितीही रुपयांची असो दहा, वीस, पन्नास, शंभर किंवा पाचशे कितीही झाली तरी त्या बोहणीचे पैसे त्याच डब्यात टाकतात, त्या डब्यावर लिहिलेले आहे "अनाथ मुलांसाठी मदतनिधी" हा डबा फक्त डबा नाही तर कितीतरी अनाथ मुलांचे भविष्य घडविणारा हा डबा आहे. असाच डबा पूर्वी लग्नात असायचा आहेरासाठी त्यात आहेर जमा केले जायचे मुलाच्या व मुलीच्या वडिलांना एक आर्थिक मदत व्हायची. काळाच्या ओघात ही चांगली प्रथा बंद झाली.

अनाथ मुलांसाठी काम करणाऱ्या सिंधुताई सपकाळ आपल्यातून निघून गेल्या

## अखेर काँग्रेसने संजय निरुपम यांना बाहेरचा रस्ता दाखवला पक्षाची कारवाई



वादळवार्ता/बीड

काँग्रेस पक्षाकडून अखेर माजी खासदार संजय निरुपम यांच्यावर मोठी कारवाई करण्यात आली आहे. काँग्रेस हायकमांडने संजय निरुपम यांची पुढच्या 6 वर्षांसाठी पक्षातून हकालपट्टी केली आहे. काँग्रेसकडून ज्येष्ठ नेते के. सी. वेणुगोपाल यांच्या स्वाक्षरीचं प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आलं आहे. यामध्ये संजय निरुपम यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. पक्षशिस्तीचं पालन न करणं आणि पक्षाविरोधात वक्तव्ये करणे यामुळे काँग्रेस अध्यक्षांनी संजय निरुपम यांच्यावरील निलंबणाच्या कारवाईचा प्रस्ताव मान्य केला आहे. निरुपम यांना आजपासून तातडीने पुढच्या 6 वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्यात येत आहे, असं प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. संजय निरुपम हे काँग्रेसचे मुंबईतील आक्रमक नेत्यांपैकी एक नेते आहेत. ते मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष देखील राहिले आहेत. संजय निरुपम एकेकाळी शिवसेनेत होते. त्यांनी शिवसेनेतून काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यांनी बरेच वर्ष काँग्रेसमध्ये निष्ठेने काम केलं आहे. त्याची जाणीव काँग्रेस पक्षालाही होती. काँग्रेसच्या स्टार प्रचारक नेत्यांच्या यादीत ते होते. पण उत्तर पश्चिम मुंबई मतदारसंघात शिवसेना ठाकरे गटाने उमेदवारी जाहीर केल्यानंतर संजय निरुपम यांनी खूप आक्रमक पवित्रा घेतला होता. त्यांनी ठाकरे गटावर सडकून टीका केली होती. त्यामुळेच त्यांच्यावर आता ही कारवाई करण्यात आली आहे. संजय निरुमप यांचा पक्षाला इशारा ठाकरे गटाने उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघातून अमोल कीर्तिकर यांना उमेदवारी जाहीर केली होती. पण त्यांच्या उमेदवारीला संजय निरुपम यांनी विरोध केला होता. याउलट त्यांनी त्या मतदारसंघावर दावा केला होता. विशेष म्हणजे यासाठी त्यांनी आपल्या पक्षाला आठवड्याची मुदत दिली होती. पक्षाने आपल्या मागणीचा विचार केला नाही तर आपण वेगळा निर्णय घेऊ, असा इशारा त्यांनी दिला होता. त्यांच्या या इशाऱ्याचा उद्या शेवटचा दिवस होता. पण त्याआधीच त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. निरुपम शिंदे गटात जाणार?

काँग्रेसची आज मुंबईत बैठक पार पडली. या बैठकीतच संजय निरुपम यांचं नाव स्टार प्रचारकांच्या यादीतून काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच निरुपम यांची पक्षातून हकालपट्टी करण्याचा प्रस्तावही तयार करण्यात आला होता. हा प्रस्ताव दिल्लीत हायकमांडला पाठवण्यात आला होता. यानंतर संजय निरुपम यांनी ट्वीट करत आपण उद्या आपला निर्णय घोषित करणार, असं जाहीर केलं. यानंतर पक्षाकडून त्यांच्यावर अधिकृत निलंबनाची कारवाई करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. निरुपम शिंदे गटाच्या वाटेवर असल्याची सध्या चर्चा आहे. याबाबत उद्या मोठा खुलासा होऊ शकतो.

# प्रेमाची गोष्ट

12 वीचा पेपर सुटला आणि सुरु झाली त्यांच्या प्रेमाची गोष्ट… प्रत्येक नात्यांची सुरवात ही मैत्रीपासून होते. खरं बघायला गेलं तर दोघांच्या दोन तरा असा होता हा मैत्रीचा प्रवास..दोन विरुद्ध दिशा ही आहे या मैत्रीची सुरवात. सतत भांडण, सतत चिडणं अशा या आगळ्या-वेगळ्या मैत्रीचं हळूहळू Bonding खूप वाढलं आणि याच दरम्यान दोघांनाही एकमेकाची खूप सवय झाली. पण विषय असा आहे दोघंही हट्टी स्वभाव आणि स्वभावाला औषध नसते….. आयुष्यभराच्या सोबतीची सवयीवर गॅरेंटी नाहीना देऊ शकत. अशातच एकमेकांबद्दल वाटणार ते प्रेम व्यक्त करता येईना. आणि हे प्रेम व्यक्त न करण्यामागे सुद्धा त्याचं एकमेकांबद्दल वाटणारं प्रेमचं लपलेलं होत…. त्यांना त्यांची मैत्री गमावण्याची भिती वाटत होती. त्यामुळे हा प्रेमाचा प्रवास खरं तर इथेच थांबला. जवळजवळ एक वर्षासाठी ते एकमेकांपासून खूप लांब गेले.. इतकं की तिने स्वताःची life पूर्ण पणे बदलून घेतली. स्वताःच्याच दुनियेमध्ये रमू लागली. पण या एका वर्षात तिने त्यांची जागा कुणालाच दिली नाही. तिला वाटायचं तो पण तिला विसरला असेल. तिच्या मनात एकच विचार यायचा,तिला जी प्रेमाची गोष्ट वाटतीये. त्याला ती वाटलीच नसेल तर?? पण काही गोष्टी किती लपवायच्या म्हणल्या तरी लपत नाहीत हेच खर, असच एक दिवस तिला त्याच्यांचं माणसांकडून कळलं तोही प्रेम करतो म्हणे तिच्यावर. समजलेले पण त्याच्याकडून कधीच तिला अस जाणवलं नाही. त्यामुळे ती सैरभैर व्हायची. तिचा प्रेमावरचा विश्वास उडायला लागला होता.

सुरु होण्याच्या आधीच संपली ती कहाणी राजापासून दुरावली राणी.

अशातच एक वर्ष उलटून गेले. एका वर्षानंतर तिने खूप धाडस करुन त्याला एका मागोमाग असे असंख्य कॉल केले. पण समोरून काहीच उत्तर आलं नाही. आणि 3-4 तासानंतर त्याचा कॉल आला. मनात धडधड वाढत चाललेली. दोघंही शांत वरवरचं बोलणं, एका वर्षानंतरचा हा पहिला कॉल दीड तास होऊन गेला तरी त्यांना बोलणं संपतच नव्हतं. दोघांच्या मनात ही एकमेकांबद्दल खुप गैरसमज, दोघांचेही प्रश्न, असंख्य आणि न संपणारे होते…पण बोलल्यानंतर का हा मैत्रीचा प्रवास थांबला असेल??? हा प्रश्न दोघांना त्रास देऊ लागला. पुढे मात्र त्यांच्या मैत्रीच स्वरूप गोडव्या मध्ये झालं. दोघेही एकमेकांना समजून घ्यायला लागले. पुढे. 7-8 माहिने ही मैत्री घट्ट रोवली गेली. त्यांना एकमेकांबद्दल अधिक काळजी, आपुलकी वाटायला लागली. आणि तेव्हा खऱ्या अर्थाने त्यांच्या प्रेमाची गोष्ट सुरु झाली. Finally दोघांनी एकमेकांना प्रेमाची कबुली दिली. तो दिवस दोघांनाही सणासारखा वाटू लागला. जगातलं सर्वात मोठं गिफ्ट मिळाल्यासारखं वाटू लागलं. दोघंही एकमेकांना समजुन घेऊ लागले. आज जवळजवळ दीड वर्षे झाली त्यांच्या प्रेमाचा प्रवास सुरु आहे. या प्रवासात अनेक चढ़ उतार आले रुसणं-फुगणं-मनवणं आणि त्यानंतर असतं नातं निभवणं. शेवटी कितीही भांडण- वाद झाले तरीही ते एकमेकांपासून जास्त लांब राहू शकत नव्हते.

पण कोणत्याही नात्यात विश्वास महत्त्वाचा असतो. एक वेळ प्रेम कमी असेल तरी चालेल. पण नात्यात विश्वास कमी असेल तर नाही चालणार…

असचं एक दिवस बोलता-बोलता विषयाने एक वेगळे वळण घेतले. तिला येणाऱ्या प्रपोज मुळे तो तिलाच बोलू लागला. त्याला त्यात तिचीच चूक वाटू लागली ते तिने सहन केले. पण,नंतर तो बोलून गेला की मुलीने काहीतरी हिन्ट दिल्या शिवाय प्रपोज येत नाहीत. त्याच्यासाठी ही एक line होती. पण तिच्यासाठी तिच्या चारित्र्याला लागलेला धक्का होता. तिच्या प्रामाणिक पणाला आज जखम झाली होती. एक मुलगी तुमचा राग सहन करून, तुमची चिडचिडही सहन करू शकते. तुम्ही दिलेल्या असंख्य वेदना ती विसरु शकते आणि त्या वेदना होऊन त्यानंतरही ती तुमच्यावर तितकचं प्रेम, माया करु शकते… पण एक गोष्ट ती कधीच सहन करू शकत नाही. ते म्हणजे तुम्ही तिच्यावर दाखवलेला अविश्वास. दुखावलेली ती निःशब्द झाली होती. प्रत्येक मुलगी ही अशीच असते का?? दिड वर्ष हा प्रेमाचा प्रवास सुरु असताना ती मुलगी दुसऱ्या मुलाला हिन्ट देईल का? त्याला असं वाटूच कसं काय शकतं? दिड वर्ष होऊन गेली, पण तिने विश्वास कमावला नाही. याची तिला लाज वाटू लागली. असंख्य प्रश्न पडू लागले. विश्वासा शिवाय पुढे ढकलेल्या नात्याला काय अर्थ?? नातं हे विश्वासावर टिकलेलं असत एकदा का नात्यातील विश्वास संपला की नातं फक्त नावापुरतं राहत. मग त्या नात्याला काही अर्थ राहत नाही.. विश्वास संपला की नातं संपतं.

कोणत्याही नात्याचा पाया हा विश्वास आहे. त्यामुळे नात कोणतंही असो त्यामध्ये विश्वास हवा. तुमच्याशी प्रामाणिक असणारी मुलगी तुमच्याकडून विश्वासा शिवाय काही मागणार नाही..

यामध्ये चुक कोणाची हा मुद्दा नसून विश्वास किती महत्वाचा असतो. विश्वासावर किती नाती जपली जातात आणि विश्वासाअभावी किती नाती तुटतात. कळत-नकळत त्याने तिच्या चारित्र्याला, तिच्या त्याच्यासोबतच्या प्रामाणिकपणाला धक्का लावलाय. तिच्या. प्रेमावर अविश्वास दाखवला आहे. निशब्द झालेली ती आपण कुठे चुकलो या एका विचाराने काहीच बोलू शकली नाही…

कारण प्रश्न असा आहे की, उत्तरालाचा ती प्रश्न विचारतीये. अशा प्रश्नावर तीच आयुष्य येऊन थांबलय.

©.सानिका मनिषा आनंदराव येडगे

## साप्ताहिक विशालक्रांती व विशाल क्रांती न्यूज चॅनेलचा वर्धापन दिन व राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

कवि सरकार इंगळी

साप्ताहिक विशालक्रांती व विशालक्रांती न्यूज यांच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले असून या सोहळ्याला पुरस्कार वितरण मा.श्री. अमोल येडगेसगो (जिल्हाधिकारी, कोल्हापूर), मा.श्री. महेंद्र पंडीतसो (जिल्हापोलीस प्रमुख, कोल्हापूर) यांचे शुभहस्ते करण्यात येणार आहे तर कार्यक्रमाचे अध्यक्षा मा.सौ . नीता बोंदर्डे(ग्रामसेविका, खोतवाडी ग्रा.पं.) असून कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.श्री. निकेश खाटमोडे - पाटीलसाो (अप्पर पोलीस अधिक्षक, गडहिंग्लज विभाग, कॅम्प इचलकरंजी.) मा.श्री. सरदार नाळेसो(डीवायएसपी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर) • प्रमुख उपस्थिती मा. श्री. सत्येंद्रराजे ना. निंबाळकर (सरकार) मा. श्री. प्रसाद बाळकू खोबरे (माजी जि.प.सदस्य) मा. श्री. विशाल कुंभार (सरपंच, खोतवाडी) मा. श्री. गजानन नलगे (उपसरपंच ग्रा.पं. खोतवाडी) मा. श्री. प्रमोद माने (तंटामुक्त अध्यक्ष, खोतवाडी) मा. डॉ. श्री. शिवाजी शर्मा (एम. के. सेवा संस्था जिल्हाध्यक्ष) मा. श्री. विजयानंद माने (पत्रकार) हे उपस्थीत राहाणार आहेत . सदर कार्यक्रताचे मुख्य आयोजक मा.श्री. आप्पासाहेब बंडू भोसले (संपादक - सा. विशाल क्रांती / विशाल क्रांती न्यूज) मा. श्री. संजय धुळगोंडा पाटील (उपसंपादक - सा. विशाल क्रांती / विशाल क्रांती न्यूज) हे परिश्रम घेत आहेत . कार्यक्रम रविवार दि. ०७/०४/२०२४ रोजी स. ११ वा. वरदविनायक मंगल कार्यालय, संगम नगर, तारदाळ पत्ता : इचलकरंजी सांगली रोड, पार्वती इंडस्ट्रीज जवळ, संगमनगर, तारदाळ.

# आधी पवारांची भेट, मग फडणवीसांची, ज्योती मेटे बीडमधून उमेदवारीवर ठाम, पंकजा मुंडे यांचं टेन्शन वाढणार?

**वादळवार्ता/परळी**

भाजप नेते पंकजा मुंडे यांची धाकधूक वाढवणारी बातमी समोर आली आहे. भाजपकडून बीडच्या विद्यमान खासदार प्रीतम मुंडे यांचं तिकीट कापून त्यांच्या बहीण पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पंकजा मुंडे यांच्याकडून जोरदार प्रचारदेखील केला जातोय. बीड हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. असं असलं तरी भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या पुढील राजकीय वाटचालीसाठी काही गोष्टी धोकादायक ठरु शकतात. कारण काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेत बजरंग सोनवणे यांनी शरद पवार गटात प्रवेश केला. गेल्या निवडणुकीत ते प्रीतम मुंडे यांच्या विरोधात उभे होते. ते या निवडणुकीत सेकंड लीडला होते. बजरंग सोनवणे यांनी शरद पवार गटात प्रवेश केल्याने त्यांना मविआकडून उमेदवारी दिली जाणार असल्याची चर्चा होती. त्यानंतर आता शरद पवार गटाकडून



शिवसंग्रामचे दिवंगत अध्यक्ष विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे ज्योती मेटे या स्वत: इच्छुक देखील आहेत."राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासोबत सकारात्मक चर्चा सुरु आहे. मी लोकसभा निवडणूक लढवण्यावर ठाम आहे. आम्ही उमेदवारी देऊ, असं म्हटलं आहे. आता ते निर्णय काय घेतात बघू. त्यांच्या चिन्हावर लढा म्हटलं तरीही चालेल. शरद पवारांनी काही निर्णय घेतला नाही तर पुढील भूमिका जाहीर करू", अशी प्रतिक्रिया ज्योती मेटे यांनी दिली.

'विनायक मेटे यांचे कार्य तुम्हाला माहिती'

दरम्यान, ज्योती मेटे यांनी कार्यकर्त्यांसमोरही आपली भूमिका मांडली. "विनायक मेटे यांची पत्नी म्हणून मी ज्योती मेटे पहिल्यांदाच संवाद साधत आहे. लोकनेते विनायक मेटे यांचे कार्य तुम्हाला माहिती आहे. मी त्याबद्दल अधिक काय बोलणार. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी बैठकीला उपस्थित राहण्यासाठी येत असताना साहेबांचं दुर्दैवी निधन झालं. शिवसंग्राम परिवाराच्या आयुष्यात 14 ऑगस्ट 2022 उजाडला. आज हे सगळे पदाधिकारी आमच्याबरोबर आहेत", असं ज्योती मेटे म्हणाल्या.'सगळ्यांची इच्छा होती की मी पुढाकार घ्यावा' "सगळ्यांची इच्छा होती की मी पुढाकार घ्यावा. पण मी सरकारी नोकरीत होते आणि माझ्यावर काही जबाबदाऱ्या पण होत्या. मी गेले वर्षभर यावर विचार करत होते. मी माझी नोकरी सांभाळून साहेबांचे काम पुढे ठेवण्याचे ठरविले. साहेब मराठा समाजासाठी लढत होते तरी ते इतर समाजासाठी काम करत होते. त्यांनी सामूहिक विवाह सोहळे सुरू केले", असं ज्योती मेटे म्हणाल्या.

## नेकनुर ग्रामपंचायतच्या वतीने आज रोजी दावत-ए- इफ्तार

### नारायण शिंदे यांची अनेक वर्षांपासूनची परंपरा



**वादळवार्ता/नेकनुर**

राज्याचे कृषिमंत्री ना. धनंजय मुंडे यांचे जिवलग मित्र बालाघाटाचे विकासाभिमुख नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष नारायण बाप्पा शिंदे यांच्या कडून अनेक वर्षांपासून रमजान महिन्यात दावत -ए- इफ्तार आयोजित करून हिंदू - मुस्लिम मध्ये सलोखा कायम ठेवण्यासाठी मानव सेवा हिच ईश्वर सेवा असुन हाच हेतू डोळ्यासमोर ठेवून रोजा इफ्तार चे अनेक वर्षांपासून अखंडपणे आयोजन करण्यात येत आहे नारायण बाप्पा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नेकनुर ग्रामपंचायतच्या वतीने दि. ४ एप्रिल गुरुवार रोजी दावत - ए- इफ्तार चे आयोजन करण्यात आले आहे. तरी नेकनुर व परिसरातील सर्व हिंदू मुस्लिम बांधवांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सरपंच सुंदर लांडगे, उपसरपंच सचिन शिंदे, सह सत्ताधारी सदस्यांनी केले आहे. बीड तालुक्यातील बालाघाटवर नेकनुर मोठे गाव असुन येथे देश स्वतंत्र झाल्यापासुन हिंदू मुस्लिम एकता कायम असून जुन्या काळातील लोकांची परंपरा आजच्या पिढीने ही कायम ठेवली असुन गेल्या अनेक वर्षांपासून बालाघाटाचे नेते नारायण बाप्पा शिंदे यांच्या वतीने रमजान महिन्यात उपवास ठेवून ईश्वर अल्लाह ची पुजा उपासना करणाऱ्या मुस्लिम बांधवांसाठी दावत-ए- इफ्तार चे अखंडपणे आयोजन करण्यात येत आहे. या निमित्ताने हिंदू मुस्लिम एकता अखंडता अबाधित ठेवण्यासाठी येणाऱ्या पिढीने याचा संदेश घेऊन हि परंपरा अखंडीत ठेवावी याच उद्देशाने या रोजा इफ्तार चे आयोजन करण्यात येत आहे. या वर्षी ग्राम पंचायतच्या वतीने दि.४ एप्रिल गुरुवार रोजी सायंकाळी ६ -४४ वाजता ग्रामपंचायत समोर आयोजित करण्यात आले आहे तरी नेकनुर आणि परिसरातील सर्व हिंदू मुस्लिम बांधवांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सरपंच सुंदर लांडगे,उपसरपंच सचिन शिंदे,मा.प.स.स.फेरोज पठाण,ग्रा.पं.स शिवाजी शिंदे, ग्रा.पं.स अर्शद अन्वर (राजा भैय्या),ग्रा.पं.स मुजीब अतार, ग्रा.पं.स,नदीम मंडोला,ग्रा.पं.स सय्यद रिजवान, सलीम पाशा,हातेम दादा, लालू जागीरदार, मकसूद पैलवान,शाहेर शेख, फाजेल बागा,हाजी सलीम पाशा,मसूद पैलवान,जावेद बिल्डर, अय्युब मनियार,शकील भैय्या, लादेन पाशा,यांनी केले आहे.

# एकनाथ खडसे खरंच भाजपात घरवापसी करणार?

**दैनिक वादळ वार्ता**

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार एकनाथ खडसे पुन्हा स्वगृही भाजपात परतणार असल्याच्या चर्चांना उधाण आलंय. याच मुद्द्यावरुन भाजप नेते गिरीश महाजन यांनी एकनाथ खडसे यांना डिवचलं आहे. पण तरीही त्यांनी सूचक वक्तव्य केलं आहे. "ज्या पक्षाने आपल्याला आमदार केलं. त्याच पक्षाला विश्वासात घेऊन दुसऱ्या पक्षात जाईल, असं त्यांचं म्हणणं योग्य आहे का? हे तर काहीही झालं. चांगलं आहे. भेटीगाठी होत असतात. तुम्ही कुठेही राष्ट्रीय स्वयंसेवक नव्हता किंवा भाजप पक्ष संघटन वाढीसाठी काम करत नव्हता. तुम्ही पहिल्यांदा पक्षात आले आणि पक्षाने तुम्हाला



आमदार केलं. पक्षामुळे तुम्ही सहा टर्म आमदार झाला. पंधरा वर्ष लाल दिव्याची गाडी दिली. आणखी काय दिलं पाहिजे पक्षाने तुम्हाला? जर तुम्हाला सगळे ओळखतात, तुमचे मोदी, शाह आणि जे. पी. नड्डा यांच्याशी चांगले संबंध आहेत. तर एवढे वाईट दिवस त्यांच्यावर का आले? माझा हा सुद्धा प्रश्न आहे", असं गिरीश महाजन म्हणाले.

## शिवप्रतिष्ठान (रजि) चुनाभट्टी मध्ये शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरी...!

मुंबई,चुनाभट्टी (प्रतिनिधी- महेश्वर तेटांबे) चुनाभट्टी येथील शिवप्रतिष्ठान (रजि) ह्या सेवाभावी मंडळाने उत्साहवर्धक अशी शिवजयंती साजरी केली. यावेळी प्रत्येकाच्या मनामनांत आणि हृदयांत तरुणाई जोश जल्लोष आणि उत्साह दिसून येत होता. शिवजयंती निमित्त अनेक ठिकाणी ढोल ताशाच्या गजरात गुलाल उधळत मिरवणुका काढण्यात आल्या. अनेक ठिकाणी शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आणि या सर्वांमध्ये विशेष आकर्षण ठरली ती म्हणजे चुनाभट्टी येथील शिवप्रतिष्ठान (रजि) मंडळ यांनी साजरी केलेली शिवजयंती. या मंडळातर्फे शिवजयंती निमित्त अतिशय दिमाखदार सोहळा आयोजित करण्यात आला होता. सुंदर अशी आरास करण्यात आली होती. राजगादीवर विराजमान श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. आजूबाजूचा परिसर विद्युत रोषणाईने डोळे दिपवित होता, तर विभागातील नागरिकांसाठी अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. याप्रसंगी शिव प्रतिष्ठानचे संस्थापक शरद साळुंके व अध्यक्ष प्रकाश साळुंके आणि सर्व सभासदांनी शिवजयंती निमित्त तरुणांसाठी कॅरम स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि महिलांसाठी हळदीकुंकू व सर्वांसाठी भंडारा आणि लकी ड्रॉ चे सुद्धा आयोजन केले होते. यामध्ये विजेत्यांना भेटवस्तू आणि पैठणी प्रदान करण्यात आल्या. तीन दिवस चाललेल्या या कार्यक्रमांमध्ये अतिशय शिस्तबद्धता दिसून येत होती. श्री छत्रपती शिवाजी महाराज की जय या उद्घोषाने संपूर्ण चुनाभट्टी परिसर दणाणून गेला. तसेच विभागातील नागरिकांसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम म्हणुन . मुक्ताई नृत्याविष्कार डान्स अकॅडमी, चुनाभट्टी यांनी अतिशय सुंदर रीतीने सांस्कृतिक कार्यक्रम व मंगळागौर सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. आणि मंडळातर्फे ग्रुपला सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि पदक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नृत्यदिग्दर्शक विनोद मोहिते आणि श्रीधर पवार यांना पुढील वाटचालीसाठी सर्वांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यास संदीप माळी, भूषण साळुंखे, अक्षय गुडेकर, स्वप्निल बालगुडे, दर्शन सोनटक्के, राकेश पवार, साहिल रुबजी, देवेंद्र घागरुम, आकाश सोनटक्के, आत्माराम म्हात्रे, श्री प्रतीक पाटणकर, श्री सचिन मोरे तसेच संस्थापक श्री शरद साळुंखे यांचे विशेष सहकार्य लाभले

# माजी आमदार मीनाक्षीताई पाटील यांना उरण मध्ये सर्वपक्षीय श्रद्धांजली. शोकसभेत पदाधिकारी, कार्यकर्त्यांना अश्रू अनावर.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण /विठ्ठल ममताबादे**

उरण मध्ये समाज प्रबोधन शिक्षण संस्थेच्या वासुदेव बळवंत फडके सभागृहात माजी आमदार मीनाक्षीताई पाटील यांची शोकसभा पार पडली. यावेळी प्रास्ताविक कामगार नेते संदीप पाटील यांनी केले.यावेळी त्यांनी १९८४ साली शेतकरी आंदोलनात आमदार मीनाक्षीताई पाटील यांचे योगदान आणि त्यांना झालेली अटक तसेच बोकडविरा गावातील त्यांच्या आठवणी सांगितल्या. तालुका चिटणीस विकास नाईक यांनी ताईंना चिटणीस झाल्यानंतर उरणमध्ये भेटलो त्यावेळी त्यांनी मला चांगले काम कर असे सांगितले. त्यांचा प्रेमळ स्वभाव मला भावला असे मत व्यक्त केले.कामगार नेते मेघनाथ तांडेल यांनी ताईंच्या कार्याचा गौरव करून कामे करण्याची पद्धती कशी होती तसेच प्रशासनावर वचक कसा ठेवायचा याबद्दलचे किस्से सांगितले. ताईंचा तळमळ व स्वभाव व शेवटच्या काळातील आठवणी सांगितल्या. ज्येष्ठ नेते काका पाटील यांनी ताईंच्या बद्दल जिव्हाळ्याचे संबंध होते असे नमूद केले. कॉम्रेड भूषण पाटील यांनी त्यांच्या आठवणी जागवल्या. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख



नरेश रहाळकर यांनी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पंचायत समितीचे सदस्य महेश म्हात्रे यांनी केगाव मध्ये पाणी समस्या दूर करण्याचे काम तसेच रस्त्यांची काम आमदार मीनाक्षीताई पाटील यांच्या माध्यमातून झाल्याचे सांगितले. महिला आघाडीच्या अध्यक्षा सीमाताई यांनी डोंगरी गावातून पाणी समस्या दूर करण्याचे काम मीनाक्षीताई पाटील यांनी केल्याचे सांगितले. तसेच त्यांच्याविषयी प्रेमळ आठवणी सांगितल्या. शहरचिटणीस शेखर पाटील यांनी आमदार मीनाक्षीताई पाटील यांच्या कार्याचा जीवनपटाचा आलेख व विधासभेत मांडलेले विविध प्रश्न विकासकामांचा उल्लेख केला. तसेच उरण अलिबाग मतदारसघात आमदार मीनाक्षीताई पाटील यांच्यासोबत काम करण्याचा सहभाग लाभला. स्वर्गीय प्रभाकर पाटील यांना त्यावेळी जवळून पाहण्याचा योग आला असे सांगीतले. माजी जि. प.सदस्या मीनाक्षी तांडेल यांनी ताईंच्या घरी कधी गेलो तर भेटवस्तू दिल्याशिवाय त्या परत जाऊ देत नसत यावेळी त्यांनी त्यांच्या अनेक आठवणी सांगितल्या. माजी सरपंच रमाकांत म्हात्रे यांनी देखील पेझारीला गेल्यानंतर ताई जेवण केल्याशिवाय परत जाऊ देत नसत असे सांगितले.जनवादी महिला संघटनेचे अध्यक्ष हेमलता पाटील यांनी आमदार मीनाक्षीताई पाटील यांच्यासोबत निवडणूक काम केल्याचे व त्यांच्या स्वभावाबद्दल सांगितले. यावेळी कॉम्रेड मधुसूदन म्हात्रे, सत्यवान ठाकूर, ऍड विजय पाटील, रमेश ठाकूर आदींनी आपली मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी सभापती नरेश घरत,उपसभापती महादेव बंडा, सहचिटणीस यशवंत ठाकूर,युवक अध्यक्ष रमाकांत म्हात्रे, रमाकांत पाटील,जीवन पाटील,नयन म्हात्रे, शहराध्यक्ष नयना पाटील, किशोर ठाकूर, मु ग पाटील,मनोहर पाटील,किशोर घरत, किरण घरत, शंकर भोईर आदी सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मीनाक्षीताईंना अखेरचा सलाम करताना मीनाक्षीताई अमर रहे मीनाक्षी ताईंना लाल सलाम अशा घोषणांनी सभागृह दुमदुमून गेले.

## मनिषा पाटील यांचे आंतर राष्ट्रीय काव्यलेखन स्पर्धेत यश

भिडेवाडाकार कवी विजय वडवेराव यांनी आयोजित केलेल्या भिडेवाडा बोलला आंतर राष्ट्रीय काव्य लेखन स्पर्धेत पालकाड ,केरळ येथील कवयित्री मनिषा पाटील यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई यांनी पुण्यातील भिडे वाड्यात भारत देशातील मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्या शाळेची १७५ वर्षे अतिशय दुरावस्था होती. आता भिडे वाडा पाडून त्या ठिकाणी ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे भव्य राष्ट्रीय स्मारक उभारण्यात येणार आहे. त्या निमित्ताने कवी विजय वडवेराव यांनी भिडे वाडा बोलला आंतरराष्ट्रीय काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन केले होते. आंतर राष्ट्रीय पातळीवरील या स्पर्धेत महाराष्ट्र,गोवा,कर्नाटक, केरळ,गुजरात, सिलवासा या राज्यातील तसेच अंमेरीका, लंडन,स्वीडन, ऑस्ट्रेलिया, दुबई, अबुधाबी या देशातून कविता आल्या होत्या. कवयित्री मनिषा पाटील यांच्या कवितेला आंतर राष्ट्रीय पातळीवर यश मिळाल्याने समाजातून त्यांचे कौतुक होत आहे. रोख रक्कम, सन्मानचिन्ह व शाल असे पुरस्काराचे स्वरूप आहे.



# मागील वर्षी अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीचा शोध लागला

### अपहरण प्रकरणी लैंगिक अत्याचारासह ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता**
**केज/गौतम बचुटे**

मागील वर्षी केज तालुक्यातून एका १५ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण प्रकरणी केज पोलिसांनी तपास करून मुलीसह तिचे अपहरण करणाऱ्या तरुणाला ताब्यात घेत त्याच्यावर पोक्सो, बलात्कार आणि ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे.

या बाबतची माहिती अशी की, दि. २३ एप्रिल २०२३ रोजी केज तालुक्यातील एका गावातून १५ वर्ष वयाच्या अल्पवयीन मुलीचे अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी अपहरण केले होते. त्या प्रकरणी अपहृत अल्पवयीन मुलीच्या भावाच्या फिर्यादी वरून केज पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुद्ध दि. २४ एप्रिल २०२३ रोजी गु. र. नं. २३८/२०२३ भा. दं. वि. ३६३ नुसार अल्पवयीन मुलीचे अज्ञात कारणासाठी अज्ञाताने अपहरण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे हे तपास करीत होते. दरम्यान या अपहरण प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे यांना अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीचा आणि तिचे अपहरण करणाऱ्या व्यक्तीची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस नाईक महादेव बहिरवाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील पोलीस नाईक विकास चोपणे यांनी सोलापूर जिल्ह्यातील वैराग ता बार्शी येथून लक्ष्मण वसंत जाधवर (रा. रामेश्वर ता. भूम जि. धाराशिव) याला तब्बल एक वर्षा नंतर दि. २ एप्रिल २०२४ रोजी ताब्यात घेतले. अल्पवयीन मुलीच्या जबाबावरून लक्ष्मण जाधवर याच्या विरुद्ध अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणी पोक्सो, बलात्कार आणि ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी सहाय्यक पोलीस अधिक्षक कमलेश मीना हे पुढील तपास करीत असून आरोपीला न्यायालयाने दि. ६ एप्रिल पर्यंत चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
# वादळ वार्ता



शुभंकरोती साहित्य परिवार आणि नॅशनल लायब्ररी तर्फे “समर्थ नारी” पुरस्काराने नॅशनल लायब्ररी वांद्रे येथे तारक मेहता का उलटा चश्मा च्या तारका सोनालिका जोशी ( मिसेस भिडे) ह्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले

# रमजान मधील दुर्दैवी घटना, आग लागल्याने एकाच कुटुंबातील सात जणांचा गुदमरून मृत्यू

**दैनिक वादळ वार्ता**
**छ.संभाजीनगर/प्रा संजय तुपे**

छत्रपती संभाजी नगरच्या छावणी परिसरात टेलरिंगच्या दुकानाला भीषण आग लागल्याची घटना घडली यामध्ये दुकानाच्या वरच्या मजल्यावर राहणाऱ्या पाच जणांचा गुदमरून तर दोन जणांचा होरपळून मृत्यू झाला असून घरमालक व पत्नी वाचले छावणी परिसरात हळू व्यक्त केली जात आहे, मृतांमध्ये तीन महिला आणि दोन मुलांचा समावेश आहे ३ एप्रिलच्या पहाटे तीन वाजेच्या सुमारास ही घटना घडली आहे हे टेलरिंगचे दुकान छावणी दाणा बाजार गल्लीतील महावीर जैन मंदिराच्या बाजूला होते घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेतली मात्र तोपर्यंत सात जणांचा दुर्दैव मृत्यू झाला होता मृतदेह शासकीय घाटी रुग्णालयात पाठविण्यात आले असून पोलिसांकडून पंचनामा केल्या जात आहे, हमीदा बेगम अब्दुल अजीज (५०) ,शेख सोहेल अब्दुल अजीज(३५ )

रेश्मा शेख सोहेल शेख (२५) वसीम शेख

अब्दुल अजीज( ३०) तनवीर वसीम शेख (२३) असीम वसीम शेख (३) आणि परी वसीम शेख (२)असे मृतांची नावे आहेत हे सर्वजण एकाच कुटुंबातील आहेत मृतांमध्ये अब्दुल अजीम यांच्या कुटुंबातील त्यांची पत्नी दोन मुले दोन सुना आणि दोन नातू यांचा समावेश आहे चार्जिंग साठी लावलेल्या मोपेड मध्ये लागली आग छावणीतील दाना बाजार येथे घराला आग लागल्याची घटना ही शॉर्टसर्किटने झाल्याचे बोलले जात आहे धर्माला कसे यांचे टेलरिंगचे दुकानातून त्यांनी त्यांची इलेक्ट्रिक मोपेड चार्जिंग साठी लावली होती त्यामुळे शॉर्टसर्किट झाल्याने नागरिकांनी सांगितले हे तीन मजली इमारत असून ग्राउंड फ्लोअर ला शेक असलम यांचे किंग स्टाईल नावाचे टेलरिंग चे दुकान आहे पहिल्या मजल्यावर ते त्यांच्या पत्नी व मुलासह राहतात दुसरा आणि तिसरा मजल्यावर त्यांनी भाडेकरू ठेवले आहेत दुसऱ्या मजल्यावर हमीदा बेगम अब्दुल अजीम यांचे कुटुंब तर तिसऱ्या मजल्यावर खुसरो व त्यांची पत्नी हे कुटुंब राहते शॉर्ट सर्किटने आग लागल्याचे समजताच घर मालक शेख अस्लम व त्यांचे कुटुंब सुखरूप बाहेर पडले मात्र अमिरा बेगम अब्दुल अजीम यांच्या कुटुंबातील पाच जण श्वास गुदमरून तर दोघेजण होरपळून मरण पावले वसीम शेख अब्दुल अजीम आणि शेख सोहेल अब्दुल अजीम हे दोघे छावणी बाजारातील म्हशीचे दूध काढून आपल्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालवत होते इमारतीतील सर्वात वरच्या भागात राहणारे खुसरो व त्यांची पत्नी यांनी शेजारच्या घराच्या गच्चीवर उड्या मारून स्वतःचा जीव वाचवला सदर घटनेची पोलीस तपासणी करत आहेत संपूर्ण छत्रपती संभाजी नगर शहरांमध्ये या घटनेची हळहळ व्यक्त करत आहेत



## तुळजाभवानी अर्बन ची गगनभरारी!

### मार्च २०२४ अखेर संस्थेकडे ६०१ कोटींच्या ठेवी

**वादळवार्ता/माजलगाव**

माजलगाव : सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या तुळजाभवानी अर्बनने ३१ मार्च २०२४ अखेर ६०१ कोटी रूपये ठेवींचा टप्पा यशस्वी केला आहे. हे अभूतपूर्व यश तुळजाभवानी अर्बनचे ठेवीदार, सभासद, खातेदार, ग्राहक आणि हितचिंतकांच्या विश्वासामुळे शक्य झाले आहे, अशी माहिती तुळजाभवानी अर्बनचे चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांनी दिली आहे.

आपली माणसं, आपला विकास

बीड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात प्रगतीचा मानबिंदू ठरलेल्या तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.माजलगाव या संस्थेने मोठी गगनभरारी घेतली आहे. ३१ मार्च २०२४ अखेरपर्यंत ६०१ कोटी ३९ लाख रूपयांच्या ठेवींचा टप्पा यशस्वी करून पुन्हा ग्राहकांमध्ये विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब केले आहे. संस्थेचा प्रगतीचा आलेख पाहता कर्ज वितरण ३८३ कोटी गुंतवणूक २७८ कोटी २५ लाख, एन.पी.ए.ग्रॉस ७ टक्के नेट २.९७ टक्के तर निव्वळ नफा १८ कोटी ६२ लाख यात स्वनिधी ५४ कोटी ३४ लाख आहे, अशीही माहिती तुळजाभवानी अर्बनच्या व्यवस्थापनाने दिलेली आहे. सहकार क्षेत्रात वेगळी ओळख आणि प्रगतीचा नवा उच्चांक गाठण्यास तुळजाभवानी अर्बन परिवार यशस्वी झाला आहे, याचे संपूर्ण श्रेय संस्थेचे ठेवीदार, ग्राहक, सभासद आणि हितचिंतकांच्या असलेल्या विश्वासामुळे हे शक्य झाले, असे चेअरमन चंद्रकांत शेजुळ म्हणाले.

## पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या माध्यमातून शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन...

**दैनिक वादळ वार्ता/केज**



अप्पर पोलिस अधीक्षक श्री. तिडके मॅडम, सहाय्यक पोलिस अधिक्षक कमलेश मीना यांची प्रमुख उपस्थितीपर मार्गदर्शन केज शहरातील व ग्रामीण भागातील सर्व प्रतिष्ठित नागरिक,शांतता कमिटीचे सदस्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळाचे अध्यक्ष/पदाधिकारी, श्रीराम नवमी मंडळाचे अध्यक्ष/पदाधिकारी, राजकीय/सामाजिक व्यक्ती, व्यापारी बांधव, पत्रकार बांधव यांना कळविण्यात येते की, दिनांक.०४/०४/२०२४ रोजी ०५ वा.(दुपारी पाच वाजता) पोलीस स्टेशन केज येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, रमजान ईद, श्रीराम नवमी-२०२४ निमित्त शांतता कमिटी बैठकीचे आयोजन केलेले आहे. सदरील बैठकीसाठी श्रीमती तिडके मॅडम, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई , मा.श्री.कमलेश मीना सहाय्यक पोलीस अधीक्षक उपविभाग केज हे उपस्थित राहून मार्गदर्शन करून सूचना देणार आहेत.

तरी सर्वांनी शांतता कमिटी बैठकसाठी दिनांक.०४/०४/२० २४ रोजी सांय ५ वाजता पोलीस ठाणे केज येथे उपस्थित रहावे असे आवाहन पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी केले आहे.

## प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू यांना धमकीचे पत्र



**दैनिक वादळ वार्ता**
**सिन्नर/सुरेश इंगळे**

लोकसभेच्या निवडणुकीत महायुतीमध्ये अमरावतीच्या जागेवर वाद सुरू आहे ,प्रहार संघटनेचे आमदार बच्चू कडु यांनी महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या विरोधात उमेदवार उभा करण्याचे निश्चित झाले आहे. अशातच आज बच्चू कडून ना तुमचा केजरीवाल करू अशी धमकी एका पत्राद्वारे देण्यात आली आहे , “जास्त उड उड करू नको , तुला ही केजरीवाल सारखं जेलमध्ये टाकेल , नाहीतर उडवून टाकेल “ अशी चिठ्ठी सापडली आहे . प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू यांना उघडपणे धमकी देण्यात आली आहे. आज नेहरू मैदानात अज्ञात इसमांकडून गर्दीतही चिठ्ठी मिळाली आहे या चिठ्ठी मुळे एकच खळबळ उडाली आहे. हे चिठ्ठी कोणी आणि का लिहिली याची अजून माहिती मिळू शकली नाही. याप्रकरणी महानगर प्रमुख बंटी रामटेके यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे .कोतवाली पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करून मैदानातील सीसीटीव्ही फुटेज च्या आधारे तपास सुरू करण्यात आला आहे.

# गंगापूर येथे गावठी कट्टा घेऊन दहशत माजवणा-याच्या मुसक्या आवळल्या

### गंगापूर पोलिसांची दमदार कामगिरी

**दैनिक वादळ वार्ता**
**गंगापूर/प्रा संजय तुपे**

गंगापूर पोलिसांना गुप्त खबऱ्या मार्फत मिळालेल्या माहितीनुसार गंगापूर वैजापूर महामार्गावरील असलेल्या अन्नपूर्णा हॉटेल समोर एक व्यक्ती दारूच्या नशेत गावठी कट्टा बाळगून दहशत वाजवत आहे अशी माहिती पोलिसांना मिळाली दिलेल्या माहितीनुसार गंगापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सत्यजित ताइतवाले यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपी पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना त्यास अटक केले विचारपूस केली असता आरोपीने उडवली ची उत्तर दिली पण पॉलिसी खाके दाखवतात तो सर्व काही खरं बोलू लागला पोलिसांना विविध गुन्ह्यांमध्ये हवा असलेला आरोपी कानिफनाथ माणिक मावस वय वर्ष ३८ रा भिवधानोरा ,ता गंगापूर , जिल्हा छत्रपती संभाजीनगर ,या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक सत्यजित ताईवाले व त्यांच्या पथकाने एक एप्रिल रोजी तात्काळ हॉटेलच्या दिशेने धाव घेऊन हॉटेलच्या परिसरात येतात हॉटेलच्या बाहेर एक इसम हा संपूर्णपणे दारूच्या नशेत गोंधळ घालताना नजरेस पडला त्याची हालचाल ही संस्थास्पद दिसून आल्याने पोलिसांनी त्याच्या दिशेने



धाव घेऊन त्या सीताफिने ताब्यात घेतले त्याला पोलिसी विश्वासात घेऊन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव कानिफनाथ असे सांगितले यावेळी त्याची अंगठी घेतली असता त्याच्या कमरेला एक पिस्टल दोन जिवंत काढतोस अवैधरीत्या विनापरवाना जवळ बाळगताना मिळून आला गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुस असे एकूण ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून मावस याच्याविरुद्ध



गंगापूर पोलीस स्टेशन कलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा व कलम ८५ (१) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे ही कारवाई पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया, अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली गंगापूर पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले पोलीस निरीक्षक केदारनाथ पालवे ,पोलीस उपनिरीक्षक सुभाष झोरे, अमलदार अमोल, कांबळे, दिनकर थोरे, अभिजीत डहाळे, राठोड ,ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केली कानिफनाथ मावसा सराईत गुन्हेगार असून त्याच्या विरुद्ध अहमदनगर जिल्ह्यातील भा द वि कलम ३०२ यासारख्या गंभीर गुन्हा दाखल असून त्याचप्रमाणे अवैधरित्या दारू विक्री करणे जुगार यासारखे सुद्धा गुन्हे दाखल आहेत या कामगिरीबद्दल गंगापूर पोलिसांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )